# प्रेसनोट

दिनांक– ०१/१२/२०१८.

**वाशी पोलीस स्टेशन येथील पोलीस कर्मचाऱ्यांविरूध्द लाचेची मागणी केल्यावरून गुन्हा दाखल.**

दिनांक ०१/१२/२०१८ रोजी, वाशी पोलीस स्टेशन, नवी मुंबई येथील पोलीस शिपाई, **संजय साहेबराव आगोने,** पोलीस नाईक, **संतोष राजेंद्र अवघडे व** पोलीस शिपाई **प्रदिप रामेश्वर राठोड** यांच्याविरुध्द यातील तक्रारदार यांच्याकडे ४०,०००/– रुपये लाचेची मागणी केल्यावरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याबाबत थोडक्यात हकिकत खालीलप्रमाणे.

यातील तक्रारदार यांचा सिनेमा एडिटींगचा व्यवसाय असुन, त्याकरीता वापरत असलेल्या कम्प्युटरमधील सॉफ्टवेअर हे बेकायदेशीर असुन तसेच तक्रारदार यांच्या जागेच्या भाडयाचे ॲग्रीमेंट हे व्यवसायाचे नसल्याचे सांगुन वरील नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे ३,००,०००/– रुपये लाचेची मागणी केली होती. तडजोडीअंती १,००,०००/– रुपये देण्याचे ठरले होते व त्यापैकी ६०,०००/– रुपये यापुर्वी स्विकारले होते. व उर्वरीत ४०,०००/– रुपयांची मागणी केली होती. सदरबाबत तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई यांचेकडे तक्रार नोंदवली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २२/०९/२०१८ रोजी पडताळणी केली असता, नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे उर्वरीत ४०,०००/–रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यावरून, पोलीस शिपाई, **संजय साहेबराव आगोने,** पोलीस नाईक, **संतोष राजेंद्र अवघडे व** पोलीस शिपाई **प्रदिप रामेश्वर राठोड** यांच्याविरूध्द लाचेची मागणी केल्यावरून वाशी पोलीस स्टेशन येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक (संशोधन २०१८) अधिनिय सन १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयाचा पुढील तपास श्रीमती अश्विनी कुसूरकर, पोलीस निरीक्षक, असेीबी, नवी मुंबई हया करत असुन त्यांचा संपर्क क्रमांक ८०८२५७१९८१ असा आहे.

**शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयास खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.**

---

१) टोल फ्री क्र. :- **1064**
२) दुरध्वनी क्रमांक :- **022–25427979**
३) ई-मेल आयडी :- **spacbthane@mahapolice.gov.in**
४) वेबसाईट :- **www.acbmaharashra.gov.in**

Scanned by CamScanner